पुराभिलेख संचालनालय, मुंबई यांच्या आस्थापनेवरील बाह्यस्त्रोत पध्दतीने उपलब्ध करुन घेण्यात आलेल्या गट-ड संवर्गातील रिक्त असलेल्या बहुउद्देशीय कर्मचारी -११ व अभिलेखवाहक-४१ अशा एकूण ५२ (अकुशल) पदांच्या सेवांकरिता होणाऱ्या खर्चास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : मपुवि-२०२५/प्र.क्र.११८(ई-१२८०८४१)/सां.का.२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक : ७ मे, २०२६

<u>संदर्भ</u> - १. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग पत्र क्रमांक मपुवि-२०२५/प्र.क्र.११८ (ई-१२८०८४१)/ सां.का.०२ , दिनांक २९.०८.२०२५1.

२. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग पत्र क्रमांक मपुवि-२०२५/प्र.क्र.११८(ई-१२८०८४१)/ सां.का.०२ , दिनांक २४.०२.२०२५

३. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग पत्र क्रमांक मपुवि-२०२५/प्र.क्र.११८(ई-१२८०८४१)/ सां.का.०२ , दिनांक २०.०३.२०२५

४. संचालक, पुराभिलेख संचालनालय, मुंबई यांचे पुरा.संचा/लेखा/लेअ/२०२६/बी/११०७ दि.२२.०४.२०२६ रोजीचे पत्र

**<u>प्रस्तावना:-</u>**

संदर्भीय क्र. १ येथील दि.२९.०८.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये पुराभिलेख संचालनालय, मुंबई यांच्या आस्थापनेवरील गट-ड संवर्गातील रिक्त असलेल्या बहुउद्देशीय कर्मचारी -११ व अभिलेखवाहक-४१ अशा एकूण ५२ (अकुशल) पदांच्या सेवा दिनांक ०१ डिसेंबर, २०२५ ते ३१ ऑक्टोबर, २०२६ या ११ महिनांच्या कालावधीकरिता, बाह्यस्त्रोत पध्दतीने विहित प्रक्रियेद्वारे उपलब्ध करुन घेण्यास आणि यासाठी आवश्यक असलेल्या रु. रु.१,६०,५०,५४८/- (अक्षरी रुपये एक कोटी साठ लक्ष पन्नास हजार पाचशे अठ्ठेचाळीस फक्त) (करांसह) इतक्या निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यापूर्वी संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णय दि.२४.०२.२०२६ अन्वये रु.४,८२,०००/- इतका निधी व संदर्भाधीन क्र.३ येथील शासन निर्णय २०.०३.२०२६ अन्वये रु. ५३,४५,८५०/- इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

संदर्भीय क्र. ४ येथील पत्रान्वये पुराभिलेख संचालनालयाच्या आस्थापनेतील गट-ड संवर्गातील रिक्त पदांची कामे बाह्ययंत्रणेद्वारे करुन घेणेसाठी निधी उपलब्ध करुन देण्याची विनंती संचालकांनी केलेली आहे. यानुषंगाने बाह्ययंत्रणेद्वारे उपलब्ध करुन घेतलेल्या मनुष्यबळांच्या मासिक वेतनाची देयके पारित करण्याकरिता निधी खर्च करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

या विभागाच्या दि.२९.०८.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये पुराभिलेख संचालनालय, मुंबई यांच्या आस्थापनेवरील बाह्यस्त्रोत पध्दतीने उपलब्ध करुन घेण्यात आलेल्या गट-ड संवर्गातील रिक्त असलेल्या बहुउद्देशीय कर्मचारी -११ व अभिलेखवाहक-४१ अशा एकूण ५२ (अकुशल) मान्यता दिलेल्या पदांचे मासिक वेतनाची देयके अदा करण्याकरिता रु. २५,६८,१६०/- (अक्षरी रुपये पंचवीस लक्ष अडुसष्ट हजार एकशे साठ फक्त) इतका निधी खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरचा खर्च संचालनाच्या मुख्य लेखाशीर्ष “मागणी क्र. झेडडी-२,२२०५, कला व संस्कृती १०४, पुराभिलेख (०१)(०२) पुराभिलेख कार्यालये (२२०५ १७९५) (अनिवार्य) १०- कंत्राटी सेवा” या लेखाशीर्षाखाली सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाकरीता उपलब्ध असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा. याबाबतचा खर्च भागविण्यासाठी, त्या-त्या आर्थिक वर्षात निधीची तरतूद करण्याची जबाबदारी, पुराभिलेख संचालनालय,मुंबई यांची राहिल.

३. संचालक, पुराभिलेख संचालनालय, मुंबई यांना यासाठी नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून, त्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास या संबधीच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. **दि यशोधरा महिला सहकारी औद्यागिक उत्पादन संस्था मर्यादित, नाशिक** या संस्थेने सर्व रकमांचे प्रदान संबंधितांना केले आहे किंवा कसे, तसेच त्यातून सर्व वैधानिक कपाती ( उदा. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा, व्यवसाय कर, आयकर, महाराष्ट्र कामगार कल्याण निधी इ.) केल्या आहेत किंवा कसे, हे तपासण्याची, तसेच यासंबधी वित्त विभाग व ऊद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे वेळोवेळी निर्गमित केलेल्या निधी वितरणाबाबतच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी संचालक, पुराभिलेख संचालनालय, मुंबई यांची राहील. तसेच बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांना पुरवठादारामार्फत प्राप्त होणारे वेतन यथायोग्य दरमहा मिळत असल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी संचालक, पुराभिलेख संचालनालय, मुंबई यांची राहील.

५. याबाबतच्या कामाची पूर्तता झाल्यानंतर खर्चाचे देयके, संचालक, पुराभिलेख संचालनालय, मुंबई यांनी शासनास सादर करावे.

६.	सदर शासन निर्णय, वित्त विभाग, विअप्र २०१३/प्र.क्र.३०/१३ विनियम भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ चे परिशिष्ट, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग-पहिला, उपविभाग ४, अ.क्र.११ अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०५०७११३०३०६१२३ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे

महाराष्ट्राने राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

MAHESH KISAN WAVHAL

Digitally signed by MAHESH KISAN WAVHAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS DEPARTMENT, 2.5.4.20=a5f6330d58102c34226358d9eb88eeaac75f0fd9db44b648fc5f6dc90d3ca6a2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=495C75B4C173C81F308BD63A1B33A5DA4EA131ED182D44EA1B502AB4662E9810, cn=MAHESH KISAN WAVHAL
Date: 2026.05.07 11:34:17 +05'30'

**(महेश वाव्हळ)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति:-**

१. महालेखापाल लेखा परीक्षा/ लेखा अनुज्ञेयता महाराष्ट्र-१, मुंबई
२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
४. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सचिव (सांस्कृतिक कार्य) यांचे स्वीय सहायक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. संचालक, पुराभिलेख संचालनालय, मुंबई.
७. अवर सचिव/कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. दि यशोधरा महिला सहकारी औद्यागिक उत्पादन संस्था मर्यादित, नाशिक (यांना पुराभिलेख संचालनालयामार्फत)
९. निवडनस्ती, सां.का.२.